महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८५ वा | दिनांक : १३/०९/२०२५ | वार : शनिवार

## ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, कुणीही टोकाचे पाऊल उचलू नये - अजित पवार



**मुंबई** : ओबीसी आरक्षणाच्या चिंतेतून लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील भरत महादेवराव कराड यांनी केलेल्या आत्महत्येबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. ही घटना 'अत्यंत दु:खद आणि मन हेलावणारी' असल्याचे सांगत, त्यांनी कराड यांच्या आत्म्याला श्रद्धांजली अर्पण केली. मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क देताना कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेत आहोत. त्यामुळे या संवेदनशील काळात कुणीही टोकाची भूमिका घेऊ नये, अशी विनंती अजित पवार यांनी केली आहे.

मराठा आंदोलन मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंदर्भातील जीआर देखील काढण्यात आला आहे. यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळणे सोपे झाले असून, त्यांना ओबीसीतून आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. मात्र, हैदराबाद गॅझेटच्या जीआरवरून ओबीसी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. मराठा आरक्षणामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निषेधार्थ लातूरच्या रेणापूर तालुक्यातील वागदरी येथील भरत महादेव कराड नामक एका ३५ वर्षीय तरुणाने मांजरा नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केली. अजित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत भरत कराड याला श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील श्री. भरत महादेवराव कराड यांनी ओबीसी आरक्षणाच्या चिंतेतून मांजरा नदीपात्रात उडी घेऊन जीवन संपवल्याची घटना अत्यंत दु:खद आणि मन हेलावणारी आहे. सर्वप्रथम त्यांच्या आत्म्यास मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

आपले सरकार सर्व समाज घटकांच्या न्याय व हक्कांसाठी कटिबद्ध आहे. मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क देताना कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेत आहोत. त्यामुळे या संवेदनशील काळात कुणीही टोकाची भूमिका घेऊ नये, अशी विनंती अजित पवार यांनी केली आहे. प्रत्येक समाजाच्या हितासाठी आम्ही काम करत असून कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, हीच आमची भूमिका असल्याचेही ते म्हणालेत.

या दु:खद प्रसंगी मी कराड कुटुंबीय आणि त्यांच्या आत्मीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या कुटुंबाला हे दु:ख सहन करण्याचं बळ देवो, हीच प्रार्थना, असे अजित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

## संजय राऊतांना नेपाळ परिस्थितीवरील वक्तव्य भोवणार ?



**मुंबई** : शिवसेनेचे (शिंदे गट) नेते संजय राऊत यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. नेपाळमधील हिंसाचारासारखी परिस्थिती भारतातही निर्माण होऊ शकते, या राऊत यांनी केलेल्या विधानावर आक्षेप घेत, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या एका शिष्टमंडळाने त्यांच्या विरोधात मुंबई पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १५० नुसार राऊत यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे.

शिवसेनेच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती यांची भेट घेतली आणि संजय राऊत यांच्यावर कारवाईची मागणी करणारे लेखी निवेदन दिले. यावेळी खासदार मिलिंद देवरा, आमदार तुकाराम काते, शिवसेना सचिव संजय मोरे, माजी खासदार संजय निरुपम, उपनेत्या शीतल म्हात्रे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

भारताचा शेजारी देश नेपाळमधील तरुणाई सरकार विरोधात रस्त्यावर उतरली आहे. नेपाळ हिंसाचाराचे समर्थन करणारे आणि तशी परिस्थिती भारतात निर्माण होईल, असे देशविरोधी मत सोशल मीडियावर व्यक्त करणाऱ्या संजय राऊतांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे, असे शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी म्हटले.

शीतल म्हात्रे म्हणाल्या, संजय राऊत सारखी व्यक्ती जे बोलते त्यामुळे शहरात बॉम्बच्या अफवा पसरणे, धमकीचे कॉल येणे असे प्रकार घडू शकतात. त्यामुळे पोलिसांनी राऊत यांची चौकशी करणे आवश्यक आहे. राऊत पत्राचाळ घोटाळ्यात तुरुंगात जाऊन आलेले आहेत. राऊत हे मनोरुग्ण झाले आहेत. राऊत सातत्याने सोशल मीडियावर समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्य करतात, देशाविरोधी गरळ ओकतात, त्यामुळे राऊत यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झालाच पाहिजे अशी मागणी शिष्टमंडळाने पोलिस आयुक्तांकडे केल्याची माहिती शीतल म्हात्रे यांनी दिली आहे.

आता मुंबई पोलिस आयुक्त या तक्रारीची गंभीर दखल घेणार का, ते राऊत यांना समज देणार की त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नेपाळमधील परिस्थितीचा दाखला देत, अशी परिस्थिती कोणत्याही देशात उद्भवू शकते, असे म्हटले होते. त्यांनी सोशल मीडियावर एका पोस्ट केली होती. त्यामध्ये, "Nepal today! ये स्थिती किसी भी देश मे पैदा हो सकती है! सावधान! भारत माता की जय! वंदे मातरम!", असे म्हटले होते. त्यासोबतच त्यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टॅग केले होते. या ट्विटसोबत त्यांनी एक व्हिडिओ देखील शेअर केला होता, "आपल्या हक्कांसाठी जागा झालेला युवक असा दिसतो," असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे केंद्र सरकारवर टीका केली होती.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे गृह सचिवांना निर्देश

**छत्रपती संभाजीनगर** : परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यू प्रकरणी आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणात सरकारकडून कायद्यातील त्रुटींवर चालढकल केली जात असल्याने न्यायालयाने राज्याच्या गृह सचिवांना ३ ऑक्टोबरपर्यंत प्रतिज्ञापत्र (अफेडेव्हिट) दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्यावर त्या प्रकरणाची न्यायाधीशांनी चौकशी केल्यानंतर पुढे काय करायचे? याविषयीची कायद्यात तरतूद नव्हती. त्याविषयी गाईडलाइन ठरवण्यासाठी आजचे मॅटर ठेवण्यात आले होते, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

न्यायालयाकडून सरकारला या संदर्भातील गाईडलाईन काय असाव्यात? याची विचारणा आणि मागणी करण्यात आली होती. मात्र, शासनाने न्यायालयात पुन्हा चालढकल केली. पॉलिसी मॅटर आहे, त्यामुळे पॉलिसी मॅटर जेव्हा चर्चेला घेतले जाईल तेव्हा कळवू, असे शासनाने न्यायालयाला सांगितल्याचे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

शासनाच्या या भूमिकेनंतर न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. न्यायालयाने राज्याच्या गृहखात्याच्या मुख्य सचिवांना स्वत:हून 3 ऑक्टोबरपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले आहे. या प्रतिज्ञापत्रात शासनाची धोरणात्मक भूमिका काय आहे, हे स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या चौकशीचा अहवाल शासनाने न्यायालयात सादर केला आहे. परंतु, सूर्यवंशी यांच्यासोबत अटक झालेल्या लोकांची अजून साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० ऑक्टोबर रोजी होणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणात सरकारची भूमिका काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

परभणी शहरात गतवर्षी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापुढील संविधानाची विटंबना करण्यात आली होती. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले होते. आंदोलकांनी वाहनांची तोडफोड केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये अनेकांना अटक करण्यात आली होती. त्यात ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी यांचाही समावेश होता. नंतर सोमनाथ यांचा कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला होता. प्रारंभी सोमनाथचा मृत्यू हार्ट अटॅकने झाल्याचा दावा केला जात होता. पण पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये त्यांचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे स्पष्ट झाले होते. या प्रकरणाचे देश पातळीवर संतप्त पडसाद उमटले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या प्रकरणी परभणीत येऊन पीडित कुटुंबाची भेट घेतली होती. तर प्रकाश आंबेडकर यांनी या प्रकरणी पीडितांची कोर्टात बाजू मांडून त्यांच्यामागे भक्कमपणे उभे राहिले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ सप्टेंबर २०२५


## दि१२/०९/२०२५ रोजी शुक्रवारी कन्नड तालुका शालेय कुस्ती स्पर्धाचे उद्घाटन संपन्न...



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** तालुका शालेय कुस्ती स्पर्धाचे उद्घाटन तालुका क्रीडा संकुल येथे संपन्न झाले .या स्पर्धेसाठी तालुक्यातून. विविध शाळेचे एकूण १५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यावेळी उद्घाटन कन्नड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रंगराव सानप साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कन्नड तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी , क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे, राष्ट्रीय कुस्ती कोच गोपाल भानावत, राष्ट्रीय कुस्ती कोच विजयसिंह बारवाल,कुस्ती कोच लक्ष्मण चव्हाण, माजी कुस्तीपटू पांडू घायतिलक, यांची प्रमुख उपस्थिती होती....

यावेळी तालुक्यातील क्रीडा शिक्षक अरुण पवार, रवी कुमार सोनकांबळे, अहिरे व्ही एच, खरे बी एस, ज्ञानेश्वर नागरे, भुसारे , मातेरे सर, गवळी सर, काकडे सर, शेळके सर ,गोरे सर फरकडे सर, आदींनी कुस्ती स्पर्धेसाठी परिश्रम घेतले....

## भारतीय सैन्य दलाची तोतया लष्करी अधिकारी आर्मी कॅप्टन म्हणून वावरणाऱ्या महिलेवर कार्यवाही



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** भारतीय सैन्य दलाची तोतया लष्करी अधिकारी आर्मी कॅप्टन म्हणून वावरणाऱ्या महिलेला सैन्य गुप्तचर यंत्रणा व दौलताबाद पोलिसांनी दि 11, गुरुवारी कारवाई केली आहेदौलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील धरमपूर ता जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे एक तोतया आर्मी कॅप्टन लष्करी अधिकारी म्हणून वावरत असल्याचे सैन्य दलाच्या गुप्तचर विभागाने आर्मी इंटिलेजन्स ला काही महिन्यांपूर्वी मिळाली होती.

याधारे तपासला सुरवात झाली तीन महिन्यापासून तिच्यावर पाळत ठेवण्यात आली होती अखेरसैन्य दलाचे गुप्तचर पथकाने दि 11 गुरुवारी सकाळी दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे व महेश घुगे कर्मचारी यांनी धरमपूर येथील रुचिका अजित जैन वय ४८ हिच्या घरी धाड टाकत तिला ताब्यात घेऊन प्रश्नांची बत्ती दिली यात रुचिका हिने आपण तोतया लष्करी अधिकारी कॅप्टन असल्याचे सांगितले.

पोलिसांनी घराची झडती घेतली असता कॉम्बेट युनिफॉर्म ज्यावर कॅप्टन रॅक चे ०३ स्टार व खाद्यावर पॅरा लिहलेले व दंडावर स्पेशल फोर्स लाल रंगाचे कापडात लिहलेले, कॉम्बॅट टोपी , काळ्या रंगाचा बेल्ट, कॉम्बॅक्ट शुज, रुचिका जैन लिहलेली नेम प्लेट सह संपुर्ण युनिफार्म. लष्करी अधिकारीचे ०४ ड्रेस, स्पेशल फोर्स पॅरा लिहलेले व छातीवर चार मेडल, रिबन काळ्या रंगाचा चमड्याचा बेल्ट, कॉम्बॅक्ट शुज, रुचिका जैन लिहलेली नेम प्लेट सह ०२ स्पेशल ड्रेस., DEBONAIR THE SECURITY PEOPLE असे लिहेल्याला कार्ड वर रुचिका जैन यांचा आमी ड्रेसवरील फोटो चिटकवलेले खोटे आय कार्ड.,रुचिका जैन यांचे राहते घरात आमी कॉम्बॅट युनिफार्म, बेल्ट ,सॉक्स ,लाईन यार्ड-. हॅण्ड ग्लोज,फेस मास्क, वॉर मेमोरीयल फोटो.हॉक टॉय एयर पिस्टल ५.५ एम. एम. नो लायसन्स रिक्वॉयर्ड फॉर धीस असे लिहलेले इ.एस.ए ६५ स्पोर्टस लिहले असलेले लांब नळीची एयर रायफल. जप्त करण्यात आले आहे व मध्य रात्री उशिरा तिच्या दोन घराला पोलिसांनी सील केले होते गुन्हा दाखल केला आहे.

रुचिका जैन ही इतर राज्यतील असून दहा वर्षपासून आपल्या कुटुंबा सोबत धरमपूर येथे वास्तव्यास आहेतिने दहा गुंठ्यांत घर व शेजारी एक मंदिर बांधले आहे परिसरात तीला माँ म्हणून सँबोधत होते सैनिकी लष्करी अधिकारी म्हणून ओळख निर्माण केल्याने तीला मानसन्मान देण्यात येऊ लागले अनेक शाळा महाविद्यालयात तिला प्रमुख उपस्थितीत मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलवत होतेअनेक शासकीय अधिकारी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ती कार्यक्रमात सहभागी व्हायची परिसरात तिने दबदबा निर्माण केले होते.

आता पोलीस या गुन्ह्यात तिने अजून कोणाला फसवणूक केली आहे का हे तपास करत आहेया गुन्ह्याचे तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील बोडखे हे करत आहे

## बापूराव पाटील यांच्या हस्ते येणेगुरच्या ज्योती मुदकन्ना यांचा सत्कार.....



मुरूम, ता. उमरगा येथे बापूराव पाटील यांच्या हस्ते ज्योती मुदकन्ना यांचा सत्कार करताना पदाधिकारी व अन्य.

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील सौ. ज्योती संतोष मुदकन्ना यांनी कौटुंबिक जबाबदारी सांभाळत नुकत्याच झालेल्या सरळ सेवा भरती परीक्षेत यश मिळवून त्यांची जलसंपदा विभागात सहाय्यक अभियंता पदावर निवड झाल्याने मुरूम येथे त्यांचा जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (ता.12) रोजी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महालिंग बाबशेट्टी, पंचायत समिती माजी उपसभापती गोविंद पाटील, येणेगुर ग्रामपंचायतीचे सदस्य संदीप बिराजदार, प्रा. शरद गायकवाड, शिक्षक सौरभ उटगे, व्यंकट यादव, संतोष मुदकन्ना आदींची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ सप्टेंबर २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रमाधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न



**जालना :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांची एक दिवसीय कार्यशाळा नुकतीच 4 सप्टेंबर रोजी संपन्न झाली.या कार्यशाळेचे उद्घाटन स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे श्री.अरुणजी अग्रवाल यांच्या हस्ते झाले. समाजोपयोगी उपक्रम राबवून एक आदर्श समाज निर्माण करावा असे ते म्हणाले.याप्रसंगी विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. भगवानसिंग डोभाळ यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेत डॉ. नारायण बोराडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील त्यांना आलेले अनुभव सांगितले. डॉ.बाळासाहेब वरखडे यांनी PFMS प्रणाली याबद्दल माहिती दिली. श्री.शालिकराम ढेपले यांनी माय भारत पोर्टल बद्दल प्रशिक्षण दिलेत्यानंतर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक नियोजन व राबविण्यात येणारे उपक्रम याविषयी सविस्तर माहिती दिली.प्रास्ताविकात प्रा.डॉ.उद्धव थोरवे यांनी कार्यशाळेची भूमिका स्पष्ट केली. अध्यक्षस्थानी डॉ. भूषण नाफडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. क्षमा अनभुले यांनी तर आभार प्रा. अभिजीत भुतेकर यांनी केले. या कार्यशाळेत जालना जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील 50 कार्यक्रमाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रियदर्शन भवरे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. व्यंकट कोरेबोईनवाड, प्रा. कालिदास सुर्यवंशी प्रा. माधव हेबाडे, प्रा. कल्याण कुंभार, प्रा. राजक्रांती वलसे. प्रा. शशिकांत चौधरी, विनोद पवार, सुंदर वायाळ, रोहन वर्तले, शिवाजी जोशी, काशीनाथ यांनी परिश्रम घेतले.






## केसरजवळगा येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या बदलीने मुलांनी फोडला टाहो...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** केसरजवळगा, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सहा शिक्षकांची बदली झाल्याने सर्वच विद्यार्थ्यांनी ओक्साबोक्शी रडताना पाहून गावाला गहिवरून आले. शिक्षकांच्या ऑनलाईन बदलीचा आदेश सोमवारी (ता. 8) रोजी धडकताच मंगळवारी जिल्ह्यातील सर्वच शाळातील कमीअधिक शिक्षकांच्या बदल्या झाल्या.

या शाळेत गेल्या सात वर्षाच्या काळात सर्वच शिक्षकांनी केलेला कायापालट व गुणवत्तेसाठी केलेली धडपड यातून एक चांगली टीम बनली होती. यात सहशिक्षक संजय चव्हाण, युसुफ गवंडी, श्रीकांत कनकधर, कल्पना क्षीरसागर, अनंतकुमार गुरनाळे व देविदास काळे यांची बदली झाल्याने सर्वच विद्यार्थी धाय मोकलून रडत होते. यावेळी व्हिडिओ कॉलवरून शिक्षकांशी बोलताना विद्यार्थ्यांच्या अश्रूंचा व शिक्षकांच्या अश्रूंचा बांध फुटला.

सर्वच शिक्षक व विद्यार्थी रडताना पाहून शिक्षक व विद्यार्थी यांच्यात तयार झालेल्या नात्यात बदलीने तडा गेल्याने मुले-मुली रडत होती. पहिलीला शिकविणारे संजय चव्हाण सर न आल्याने माझ्या सरांची गाडी का नाही, असे प्रश्न विचारून अनेक मुले रडत होती. संजय चव्हाण, देविदास काळे व अनंतकुमार गुरनाळे यांच्या आठवणी सांगून अनेक मुले रडत होती. यावेळी गावातील शिक्षक युसुफ गवंडी, श्रीकांत जवळेकर व शाळेतील उपस्थित शिक्षक बालाजी भोसले यांच्या गळ्यात पडून सर्वच शिक्षकांच्या आठवणीत मुले रडत होती.

या शाळेत बारा पदे मान्य होती पण प्रशासनाने शिक्षक न दिल्याने पालकांनी टी. सी. काढल्याने आता दहाच पदे शिल्लक आहेत. यापैकी बदलीत दोनच शिक्षक आल्याने एकूण दहापैकी सहा जागा आणखी रिक्त आहेत. अडीचशेच्या जवळ पटसंख्या असताना शिक्षकसंख्या नसल्याने पट कमी होतोय, याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अन्यथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात शाळा भरवू असा इशारा यावेळी बोलताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पाटील यांनी दिला आहे.

## ११ वी महिको अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धा उद्घाटन



**जालना :** 11 वी महिको अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धा उद्घाटन प्रसंगी ग्रो इंडियाचे संशोधन आणि विकास अधिकारी डॉ. राजेंद्र मराठे यांच्यासह प्राचार्य डॉ. कविता प्राशर, अमृतलाल खंडेलवाल, डॉ. बी. बी. सले, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. कुणाल देशपांडे, डॉ. निशिकांत लोखंडे, प्रा. अभिषेक ढेंबरे आणि इतर. ही स्पर्धा 12 व 13 सप्टेंबर अशी दोन दिवस चालणार आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ सप्टेंबर २०२५


## मनपा अंतर्गत जिल्हा स्तरीय प्रियदर्शनी येथे झालेल्या कॅरम स्पर्धेत मयुरी भरत नाथभजन हिने पाचवा क्रमांक पटकावला



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा अंतर्गत जिल्हा स्तरीय प्रियदर्शनी येथे झालेल्या कॅरम स्पर्धेत अंडर 17 मध्ये छत्रपती संभाजी नगर मनपा मुकुंदवाडी मधील विद्यार्थिनी मयुरी भरत नाथभजन हिने पाचवा क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली.

त्यासाठी तिचे शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक श्री सचिन गायकवाड सर, क्रीडा शिक्षक श्री दिपक महानवर सर, क्रीडा प्रशिक्षक श्री सय्यद इरफान सर यानी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा तिचे खूप खूप अभिनंदन

## शैलेंद्र राजेंद्रसिंग पाटील आणि प्रकाश सिताराम ढमाले यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर :** भारत विकास परिषद छत्रपती संभाजीनगर तर्फे वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय श्री शैलेंद्र राजेंद्रसिंग पाटील आणि प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आ. श्री . प्रकाश सिताराम ढमाले यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने दिनांक १२/०९/२०२५ रोजी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमा प्रसंगी भारत विकास परिषदेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. कुलकर्णी आणि इतर मान्यवरांच्या हस्ते दोघांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय श्री निलेश पाटील सर यांनी दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापकांचा संस्थेच्या आणि शाळेच्या वतीने सत्कार केला. याप्रसंगी सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आंदोलकांवर दाखल अन्यायकारक गुन्हे मागे घेण्याची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर अन्यायकारकपणे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांविरोधात रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने गृहराज्यमंत्री श्री. योगेश कदम यांना निवेदन देण्यात येऊन विद्यापीठात शिक्षण, वसतिगृह सुविधा, आर्थिक अडचणी आणि शैक्षणिक न्याय यांसारख्या मुद्द्यांवर लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कुलगुरू आणि कुलसचिव यांच्या सूडबुद्धीने किरकोळ मुद्द्यांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने ते गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी सचिन निकम यांनी केली आहे.

दि.20 जून 2025 रोजी महाराष्ट्र शासनाने गृह विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/जवशा-२ अंतर्गत दिलेल्या निर्देशांनुसार, 31 मार्च 2025 पर्यंत दोषारोपपत्र दाखल असलेल्या राजकीय व सामाजिक आंदोलनाशी संबंधित गुन्हे विचार करून मागे घेण्यास मान्यता दिली आहे.

त्याचा आधार घेत विद्यार्थ्यांच्या आणि आंदोलनकर्त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी कुलगुरू, कुलसचिव हे पदांचा गैरवापर करून पोलीस प्रशासनाला हाताशी धरून आंदोलक विद्यार्थ्यांना लक्ष करत असून विद्यापीठातील कुलगुरू, कुलसचिव कुणासोबत चर्चा ही करत नाहीत, भेटीसाठी वेळ देत नाहीत, कार्यालयात कुणालाही प्रवेश दिला जात नाही ही हुकूमशाही असल्याकडे लक्ष वेधण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण व हक्कांसाठीच्या विचारांचा दाखला देत तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

अन्यायकारक गुन्हे मागे घेणे, पोलीस प्रशासनाला लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याबाबत आदेशीत करणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षण व भवितव्याचे रक्षण करणे आणि आंदोलनाला संविधानाच्या चौकटीत सहकार्य करणे अश्या मागण्या निवेदनात केल्या आहेत.

यावेळी प्रदेशाध्यक्ष मा. विवेक बनसोडे, महाराष्ट्र नेते मा. सुनील वाकेकर, मुंबई अध्यक्ष आशिष गाडे, मराठवाडा अध्यक्ष सचिन निकम आणि शहराध्यक्ष राहुल गवळी, हंसराज खुणे आदींची उपस्थिती होती.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ सप्टेंबर २०२५


## समृद्धी महामार्गाच्या कॉन्ट्रॅक्टर वर गुन्हा दाखल



**दौलताबाद (जावेद अहेमद)** दि 10 बुधवार रोजी समृद्धी महामार्ग छत्रपती संभाजी नगर कडून वैजापूर कडे जाणाऱ्या माळीवाडा जवळ असलेल्या धुळे सोलापूर पुलाच्या वर चॅनेल क्र ४४२ वर रस्त्याच्या दुरुस्ती साठी इपोक्सि ग्राउंडिंग पद्धतीने काम केले होते.

यामुळे नोजल ट्यूब रस्त्यावर टाकलेले होते ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी चोविस तासाचे अवधी लागते नंतर हे नोजल कापून काढले जाते सदर ठिकाणी ट्राफिक ड्रायव्हर्जन करण्याकरिता मजबूत बेरएकेटिंग चांगल्या दर्जाचे रिप्लेक्टर लावणे गरजेचे असून सुद्धा तसे न केल्याने त्यामुळे रात्री साडे बारा वाजता छत्रपती संभाजी नगर कडून वैजापूर कडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कार चालकांना लक्षात आलं नसल्याने स्कोडा कंपणीची गाडी क्रमांक MH १५ DS ५३२७, होन्डा सीटी कंपणी चे वाहण क्रमांक MH ०२ BT ८१७१ व इतर एक वाहन पंचर होवुन नुकसान झालेया घटनेनंतर एका कार चालकाने घटनास्थळ वरून ११२ क्र फोन करून या ठिकाणचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केलासदर घटने नंतर असे चित्र निर्माण झाले होते की गाड्या लुटण्यासाठी चोरांनी खिळे लावले होते अशी उलटसुलट चर्चा सुरू झाली होती व्हिडिओ व्हायरल होताच पोलीस प्रशासन जागी झाले.

दौलताबाद पोलीस व महामार्ग पोलीस यांनी घटनास्थळी धाव घेत कार चालकांना मदत करत वाहने दुरुस्ती करण्यास मदत केली होती यावेळी काही काळ ट्राफिक थांबवली होते यामुळे कार चालकांना नाहक त्रास सहन करावा लागला होतात्यांच्या अश्या कृतीमुळे एखादे वाहन पंक्चर होवुन, टायर फुटुन वाहन पलटी होवुन एखादा मोठा अपघात होवु शकतो व जिव जावु शकतो हे माहित असतांना सुद्धा त्यांनी पुरेशी काळजी घेतलेली नाही.

या हलगर्जीपणा पणा मुळे पोलीस अंमलदार योगेश पंडित सूर्यवंशी यांच्या फिर्यादी वरून मेगा इंजिनियरिंग इंन्फ्रास्ट्रक्चर कंपनी चे कॉन्टॅक्टर सत्यनारायण यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बापू डोंबळे हे करत आहे

## संस्काररुपी पिढी घडवण्याचे कार्य आई करते... समुपदेशक डॉ. अपर्णा अष्टपुत्रे यांचे प्रतिपादन...




**छत्रपती संभाजीनगर :** आजच्या वेगवान युगात येणाऱ्या पिढ्यांची आव्हान समजून घेणं, काळाची गरज बनली आहे मुलं-मुली सोबत संवाद ठेवून खऱ्या अर्थाने आपल्या कुटुंबाचा विकास, अर्थार्जन करत आई कुटुंबव्यवस्थेचा कणा आणि घराचा केंद्रबिंदू आहे.

किशोरवयीन मुलांना संस्काररुपी बाळकडू देण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने आईकडे जाते तेव्हा आईंनी मुलं मुलीचे मन ओळखणे, त्यांच्यासोबत संवाद साधणं, मुलाचे मित्र होणं गरजेचे असून चांगला माणूस होण्यासाठी आईची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे म्हणूनच खऱ्या अर्थाने त्यांना जगण्याचे आणि लढण्याचे बळ देणार चालत बोलतं विद्यापीठ म्हणजे आई होय असे प्रतिपादन डॉ. अपर्णा अष्टपुत्रे यांनी केले.

त्या देवगिरी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आई मेळाव्या प्रसंगी बोलत होत्या त्यांनी किशोरवयीन मुलांमधील समाज माध्यमाचे वाढते प्राबल्य, आई- मुलांचा एकत्र प्रवास-समज प्रेम आणि आत्मविश्वास या विषयावर टाकलेला प्रकाश लाखमोलाचा ठरला.

यावेळी आई पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना डॉ. अपर्णा अष्टपुत्रे यांनी समर्पक उत्तरे दिली आणि आई पालकांचे समाधान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीच्या सदस्य मा.नीलिमा सावंत होत्या. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थी, पालक,शिक्षक असे नाते निर्माण करणे गरजेचे आहे जेणेकरून नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण होईल आईने मुलं आणि मुली सोबत मैत्रीत्वाचे नाते निर्माण करावे अशा सदिच्छा दिल्या.

निमंत्रक प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, संयोजक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे उपप्राचार्य प्रा.सुरेश लिपाने, उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे उपप्राचार्या डॉ. अपर्णा तावरे, जेईई -नीट सेलचे संचालक प्रा.एन.जी. गायकवाड पर्यवेक्षक डॉ.किरण पतंगे, पर्यवेक्षिका डॉ. सीमा पाटील डॉ. वंदना जाधव डॉ. कल्याण माळी यांची उपस्थिती होती.

आई मेळावा या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संयोजक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी मुलांची क्षमता,आवड लक्षात घेऊन त्याला यशस्वी नागरिक बनवणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या मुलं- मुलीची मैत्रीण व्हा, त्यांच्यावर बंधने लादू नका त्याला मुक्तपणाने जगू द्या तुमच्या मुलांनी तुमच्याशी घडलेल्या घटना मनमोकळेपणाने सांगाव्या असे तुमचे व मुलाचे नाते असावे असे आवाहन केले. या आई मेळाव्यात ४५० पेक्षा जास्त आई पालकांनी सहभाग नोंदवला होता.

डॉ.तुकाराम वांढरे यांच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. वंदना जाधव यांनी करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अरुंधती वाडेवाले यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका डॉ.सीमा पाटील यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ सप्टेंबर २०२५

# सकारात्मक विचार : समाजजीवनाला दिशा देणारे प्रेरणास्त्रोत

मानवी जीवनाची पायाभरणी ही विचारांवर आधारित असते. व्यक्तीच्या मनात निर्माण होणारे विचार तिच्या वर्तनाला, कृतीला आणि निर्णयक्षमतेला दिशा देतात. प्रत्येक माणूस आपले आयुष्य घडवताना परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो, त्यातूनच त्याच्या विचारप्रक्रियेचे स्वरूप ठरते. या विचारांमध्ये सकारात्मकता असेल तर जीवनाचा प्रवास सहज आणि सुलभ होतो, तर नकारात्मकता जीवनाला अडचणी, भीती आणि नैराश्याकडे नेते. म्हणूनच जगभर 13 सप्टेंबर हा दिवस 'सकारात्मक विचारांचा दिवस (Positive Thinking Day)' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैयक्तिक पातळीपुरते मर्यादित नाही, तर त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनावरही दूरगामी परिणाम होतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचार ही केवळ मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली नसून समाजाच्या उन्नतीचे, प्रगतीचे आणि ऐक्याचे प्रमुख साधन आहे.

मानसशास्त्र आपल्याला सांगते की विचार हे मानवी जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहेत. परंतु समाजशास्त्राच्या नजरेतून पाहिले असता हे विचार केवळ वैयक्तिक प्रवासात अडकून राहत नाहीत, तर ते सामाजिक वर्तनाला आकार देतात. समाज ही व्यक्तींनी निर्माण केलेली रचना असल्याने समाजाच्या प्रवृत्ती आणि दिशा या व्यक्तींच्या विचारसरणीवरच ठरतात. जर समाजातील बहुसंख्य लोक सकारात्मक विचारांकडे झुकले तर त्या समाजात सहकार्य, समता, सहिष्णुता आणि प्रगतीची प्रक्रिया गतिमान होते. परंतु नकारात्मक विचारांचे प्रमाण वाढले तर समाजात अविश्वास, तणाव, हिंसा, शोषण आणि नैराश्याचे वातावरण निर्माण होते. म्हणूनच सकारात्मक विचारांचा दिवस हा समाजाला सकारात्मक विचारसरणीची आठवण करून देणारा आणि ती रुजविण्यासाठी प्रेरित करणारा दिवस ठरतो.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत सकारात्मक विचारांचे महत्त्व प्राचीन काळापासून अधोरेखित झालेले आहे. भारतातील अनेक प्रार्थना सकारात्मक विचारसरणीचेच द्योतक आहेत. या प्रार्थनांमधून सर्व मानवजातीच्या कल्याणाची, सुखाची आणि प्रगतीची भावना व्यक्त झाली आहे. संत ज्ञानेश्वरांनी आनंदी जीवनाचा संदेश दिला, तर संत तुकारामांनी संकटाच्या काळातही जीवनामध्ये आशावादी दृष्टिकोन ठेवण्याची शिकवण दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिकूल परिस्थितीतूनही शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या माध्यमातून नवा समाज उभारला. महात्मा गांधींनीही सकारात्मक विचारांना जीवनपद्धतीत स्थान देत 'अहिंसा आणि सत्याग्रह' या मार्गांचा अवलंब केला. या सर्व परंपरा आजच्या काळातही समाजाला प्रेरित करणाऱ्या आहेत.

आधुनिक समाजशास्त्रीय संदर्भात विचार करता सकारात्मक विचार ही फक्त वैयक्तिक उन्नतीची गुरुकिल्ली नाही, तर सामूहिक विकासाचे साधन आहे. उदाहरणार्थ, बेरोजगारी, गरिबी, महागाई, असमानता या समस्यांचा सामना करताना जर समाज सकारात्मक दृष्टिकोन ठेवतो, तर नवनव्या संधी, उद्योजकता, सामाजिक उपक्रम आणि सहकार्याचे मार्ग शोधले जातात. याउलट नकारात्मक विचार प्रबळ झाल्यास निराशा, गुन्हेगारी, व्यसनाधीनता आणि आत्महत्यांसारख्या समस्यांना खतपाणी मिळते. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचार म्हणजे समस्यांपासून पळ काढणे नव्हे, तर समस्यांचा सामना करताना आशावादी भूमिका घेणे होय.

कुटुंबव्यवस्था ही समाजाची मूलभूत सामाजिक संस्था आहे. जर कुटुंबातील वातावरण सकारात्मक असेल, पालकांनी मुलांना आत्मविश्वास, धैर्य आणि सहकार्याची शिकवण दिली, तर त्या कुटुंबातून समाजासाठी सक्षम नागरिक तयार होतात. शाळा आणि महाविद्यालयांनी सकारात्मकतेवर आधारित संस्कृती जोपासली, तर विद्यार्थी केवळ गुणांच्या मागे धावणारे न राहता जीवनाकडे व्यापक दृष्टीकोनाने पाहणारे, सहानुभूतीने वागणारे आणि सामाजिक जबाबदारी ओळखणारे घडतात. कार्यक्षेत्रातही सकारात्मक विचारांचे वातावरण असेल, तर कामगार व अधिकारी यांच्यात विश्वास, सन्मान आणि परस्पर सहकार्य वाढते. समाजातील संघर्ष आणि तणाव कमी करण्यासाठी सकारात्मक विचार अत्यंत आवश्यक आहेत. जातीयवाद, धार्मिक असहिष्णुता, लिंगभेद, वर्णभेद यांसारख्या सामाजिक समस्या नकारात्मकतेतूनच जन्म घेतात. जर सकारात्मक विचारांची संस्कृती समाजात रुजवली गेली, तर विविधतेतून एकात्मता साधता येईल. सकारात्मक दृष्टिकोनातून माणूस दुसऱ्याच्या वेगळेपणाला धोका न मानता त्याला एक नवी संधी मानतो. त्यामुळे समाजात समतेचे, न्यायाचे आणि बंधुभावाचे मूल्य बळकट होतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सकारात्मक विचारांची गरज अधिक तीव्रतेने भासते. स्पर्धेच्या या युगात अनेक तरुण अपयश, नोकरीची असुरक्षा, नात्यांमधील तणाव यामुळे नैराश्यात जातात. सामाजिक माध्यमामुळे सतत तुलना आणि अपुरे वाटण्याची भावना वाढीस लागते. या परिस्थितीत सकारात्मक विचारच मानसिक आरोग्याचे रक्षण करतात. एकाच वेळी, सामूहिक पातळीवरही सकारात्मक विचार समाजातील आशा जिवंत ठेवतात. उदा. कोविड-19 महामारीच्या काळात अनेक लोकांनी सकारात्मक विचारसरणी स्वीकारत एकमेकांना मदत केली, रुग्णांना आधार दिला, आणि समाजाला एकत्र ठेवले. माध्यमांची भूमिका या संदर्भात महत्त्वाची ठरते. माध्यमांनी सतत नकारात्मक घटना दाखवून समाजात भीती आणि निराशा पसरवण्याऐवजी सकारात्मक उदाहरणे, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक यशोगाथा दाखवल्या, तर सामूहिक चेतना अधिक बळकट होईल. शिक्षण प्रणालीनेही विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शासनाने धोरणांमधून मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि सामूहिक विकासाला चालना दिली पाहिजे.

सकारात्मक विचारांचा अर्थ वास्तवाकडे दुर्लक्ष करणे नाही. वास्तवातील अडचणी, संकटे आणि आव्हाने ओळखून त्यांना सामोरे जाण्याची प्रेरणा देणे हेच सकारात्मक विचारांचे खरे तत्त्व आहे. समाजात बदल घडवण्यासाठी, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी, समता आणि न्यायासाठी प्रयत्न करण्यासाठीही सकारात्मक विचारांची ताकदच आवश्यक आहे. नकारात्मक विचार संघर्ष वाढवतात, तर सकारात्मक विचार संघर्षाला सृजनशीलतेत रूपांतरित करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचारांचा दिवस हा केवळ स्मरणदिन नाही, तर कृतीसाठी प्रेरणा देणारा क्षण आहे. या दिवसाच्या निमित्ताने व्यक्तीने स्वतःच्या मनात सकारात्मकता जोपासावी, कुटुंबाने आशावादी वातावरण निर्माण करावे, शाळा-महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवावा, माध्यमांनी समाजाला प्रेरणा द्यावी आणि शासनाने धोरणांमधून सकारात्मकतेला चालना द्यावी. असे झाले तर समाजात एकात्मता, प्रगती, शांती आणि समता यांचे नवीन पर्व सुरू होईल.

एकंदरीत, सकारात्मक विचार ही समाजबदलाची खरी गुरुकिल्ली आहे. एका व्यक्तीच्या मनातील आशावादी विचारही संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकतात. वैयक्तिक जीवनातून सामूहिक जीवनापर्यंत सकारात्मक विचारांची ताकद मानवतेच्या उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरते. म्हणूनच सकारात्मक विचारांचा दिवस हा समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिला तर सामाजिक आरोग्य, विकास आणि मानवी मूल्यांना अधोरेखित करणारा आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी मिळून आशावादी, सकारात्मक विचारसरणीची संस्कृती रुजवण्याचा संकल्प केला, तर निश्चितच आपला समाज अधिक प्रगतिशील, सक्षम आणि मानवी मूल्यांनी समृद्ध बनेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
ईमेल – bagate.rajendra४@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002